## नियमित दिवाणी अपील क्र.११२/२०१८ मधील नि. ३० खालील आदेश

०१. अपिलकारांनी प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र.१ महादेव केशव गांवकर यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी विलंब झाल्याने झालेली अबेटमेंट रद्द होवून मिळावी यासाठी केलेला आहे. अपिलकारांच्या म्हणण्यानुसार, उत्तरवादी क्र.१ महादेव केशव गावकर हे दि.११.०८.२०१९ रोजी मयत झाले. अपिलकारांना कायदयाचे ज्ञान नसल्याने उत्तरवादीचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक असते याची त्यांना माहिती नव्हती. त्यामुळे उत्तरवादी क्र.१ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस मुदतीत अभिलेखावर आणणे अपिलकारांना शक्य झाले नाही. त्यामुळे उत्तरवादी क्र. १ बाबत सदर अपील अबेट झाले. वारस अभिलेखावर आणण्यास झालेल्या विलंबामागे अपिलकारांचा कोणताही निष्काळजीपणा नव्हती. त्यामुळे झालेली अबेटमेंट रद्द व्हावी अशी अपिलकारांची विनंती आहे.

०२. अर्जाचे कामी उत्तरवादी क्र.१ च्या नियोजित वारसास नोटीस पाठविली होती. उत्तरवादी क्र. १ च्या नियोजित वारसांनी तसेच अन्य उत्तरवादी क्र. ३ ते ५ यांनी या अर्जाकामी म्हणणे सादर केले असून, त्यांच्या म्हणण्यानुसार, अपिलकारांचा अर्ज कायदयाने चालणारा नाही. वारस अभिलेखावर आणण्याकरीता विलंब माफीचा स्वतंत्र अर्ज दाखल केला नसून विलंबाबाबतची विनंतीदेखील अर्जात केलेली नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिताच्या वारसाबाबतच्या तरतुदी विचारात घेता अर्ज चालण्यास पात्र नसल्याने तो नामंजूर करण्यात यावा.

०३. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर मुदतीत न आणल्याने झालेली अबेटमेंट रद्द होण्यासाठी केलेला आहे. उत्तरवादी क्र.१ दि. ११.०८.२०१९ रोजी मयत झाल्याबाबत मृत्युप्रमाणपत्र नि. ३३/१ वर दाखल करण्यात आलेले आहे. त्यावरुन उत्तरवादी क्र.१ दि. ११.०८.२०१९ रोजी मयत झाल्याचे दिसते. प्रस्तुतचा अर्ज दि.१९.११.२०१८ रोजी दाखल केलेला आहे. वारस अभिलेखावर आणण्यासाठी १० दिवसांचा विलंब झालेला आहे. त्याचे कारण पाहता, सदरचा विलंब हा केवळ अपरिहार्यपणे झाला असून, त्यामागे त्यांचा निष्काळजीपणा नव्हता असे अपिलकारांचे म्हणणे आहे.

०४.	प्रस्तुतचे अपील सह दिवाणी न्यायाधीश, सावंतवाडी यांनी दिवाणी दावा क्र.७४/२००८ चे कामी पारीत केलेल्या हुकूमाविरुध्द करण्यात आलेले आहे. मूळ दावा वाटपाचा होता. सदर दावा मंजूर होवून त्या निर्णयाद्वारे दावा मिळकतींपैकी प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या नांवे सातबारा उता–यांमध्ये व ८–अ खाते उता–यामध्ये नमूद सर्व दावा मिळकतींमध्ये वादीचा १/२ हिस्सा ठरविण्यात आला. त्या निर्णयाने व्यथित होवून अपिलकाराने प्रस्तुतचे अपील वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ म्हणजेच उत्तरवादी क्र. १ ते ४ यांच्याविरोधात केले आहे. दाव्याचे स्वरुप पाहता, उत्तरवादी क्र.१ म्हणजेच मूळ दाव्यातील वादी यांचा हिस्सा मूळ दाव्याद्वारे ठरविण्यात आला होता. त्यामुळे वादविषयाच्या अंतिम निराकरणाकरीता मयत उत्तरवादी क्र. १चे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. विलंबाचा कालावधी पाहता, केवळ विलंबाच्या कारणास्तव वारस अभिलेखावर आणणेची परवानगी नाकारणे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होणार आहे. झालेल्या विलंबामुळे उत्तरवादींचे जे काही नुकसान झाले त्याचे खर्चाच्या स्वरुपात निराकरण होऊ शकते. त्याकरीता खर्चाचे आदेश करुन हा अर्ज मंजूर करणे न्यायाचे कारणे योग्य वाटते. सबब, खालील आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१.	रक्कम रु.३००/– खर्चाचे आदेश करुन अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२.	खर्चाची रक्कम नियोजित उत्तरवादी क्र. १ चे वारस व उत्तरवादी क्र. ३ ते ५ यांना देण्यात यावी.

दिनांकः २२.०३.२०२१.

Digitally signed by Varsharani Abhijit Patravale
Date: 2021.03.23 17:45:39 +05'30'

तदर्थ जिल्हा न्यायाधीश –१,
सिंधुदुर्ग – ओरोस

## नियमित दिवाणी अपील क्र.११२/२०१८ मधील नि. ३१ खालील आदेश

०१. अपिलकारांनी प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र.१ महादेव केशव गांवकर यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर आणणेसाठी परवानगी मिळावी यासाठी केलेला आहे. अपिलकारांच्या म्हणण्यानुसार, उत्तरवादी क्र.१ महादेव केशव गावकर हे दि.११.०८.२०१९ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जात नमूद वारसांव्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे अपिलाचे कामी उत्तरवादी क्र. १ चे अर्जात नमूद नियोजित वारसांना सामील करुन तशी दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी अपिलकारांची विनंती आहे.

०२. अर्जाचे कामी उत्तरवादी क्र.१ च्या नियोजित वारसास नोटीस पाठविली होती. उत्तरवादी क्र. १ च्या नियोजित वारसांनी तसेच अन्य उत्तरवादी क्र. ३ ते ५ यांनी या अर्जाकामी म्हणणे सादर केले असून, त्यांच्या म्हणण्यानुसार, अपिलकारांचा अर्ज कायदयाने चालणारा नाही. वारस अभिलेखावर आणण्याकरीता विलंब माफीचा स्वतंत्र अर्ज दाखल केला नसून विलंबाबाबतची विनंतीदेखील अर्जात केलेली नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिताच्या वारसाबाबतच्या तरतुदी विचारात घेता अर्ज चालण्यास पात्र नसल्याने तो नामंजूर करण्यात यावा.

०३. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. झालेली अबेटमेंट न्यायालयाच्या आदेशाने रद्द करण्यात आली आहे. केवळ विलंबाच्या कारणास्तव वारस अभिलेखावर आणणेची परवानगी नाकारणे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होणार आहे. झालेल्या विलंबामुळे उत्तरवादींचे जे काही नुकसान झाले त्याचे खर्चाच्या स्वरुपात निराकरण होऊ शकते. त्याकरीता खर्चाचे आदेश करुन हा अर्ज मंजूर करणे न्यायाचे कारणे योग्य वाटते. सबब, खालील आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. रक्कम रु.३००/– खर्चाचे आदेश करुन अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम नियोजित उत्तरवादी क्र. १ चे वारस व उत्तरवादी क्र. ३ ते ५ यांना देण्यात यावी.

३. अर्जात नमूद नियोजित वारस विहित मुदतीत अभिलेखात समाविष्ट करावेत व तशी दुरुस्ती अपिलमेमोत करण्यात यावी.

Digitally signed by Varsharani Abhijit Patravale
Date: 2021.03.23 17:46:25 +05'30'

दिनांकः २२.०३.२०२१.

तदर्थ जिल्हा न्यायाधीश –१,
सिंधुदुर्ग – ओरोस